**MHBI100020172025**

**नि.क्र. १ वरील आदेश**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना मृत्युपत्र, व्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणुक करण्यासंबंधी तरतुद करण्याबाबत विनिमय (बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७) मधील कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, मयत गोरोबा नरसु लोंढे यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी, अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे. गोरोबा नरसु लोंढे हे दिनांक १९.०२.२०२५ रोजी लोंढे गल्ली, केज, ता.केज, जि.बीड येथे मयत झाले आहेत. मयत गोरोबा नरसु लोंढे यांची आई नामे अनुसया नरसु लोंढे हया ३० वर्षापुर्वी मयत झाल्या असुन त्यांच्या मृत्युची नोंद उपलब्ध नाही. मयत गोरोबा नरसु लोंढे यांच्या पश्चात्त अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदारांतर्फे अर्जदार क्र. २ चे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी क्र.१२) वर दिलेले आहे. सोबत अर्जदाराने गोरोबा नरसु लोंढे यांचे मुळ मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी क्र. ५), स्वयंघोषणा वारस प्रमाणपत्र (निशाणी क्र.६), अर्जदार क्र. १ ते ३ च्या आधारकार्डच्या सत्यापित प्रती (निशाणी क्र. १५/१ ते १५/३) इत्यादी कागदपत्र दाखल केलेले आहेत.

४. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकूराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र ''लोकनायक'' च्या दि. ०६.१२.२०२५ च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली व त्याची प्रत निशाणी क्र. ११ वर दाखल केली आहे. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा

आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्र.२ ने निशाणी क्र. १२ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केले. त्याची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधीत आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमूद कथनांस मिळते जुळते आहे. अर्जदाराचा पुरावा असे दर्शवितो की, मयत गोरोबा नरसु लोंढे हे केज, ता. केज, जि. बीड येथील रहिवाशी होते व ते दि.१९.०२.२०२५ रोजी केज, ता. केज, जि. बीड येथे मयत झाले असून अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ चे वडील आहेत.

५. वारस प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीबाबत मयत व्यक्तिचे अथवा तिच्या वारसांचे मालकी हक्क ठरविण्यासाठी प्रदान केले जात नसून, केवळ एखादी व्यक्ती ही मयत व्यक्तिची वारस आहे किंवा नाही हे ठरविण्यापर्यंतच मर्यादीत आहे. अर्जातील कथन तोंडी व कागदोपत्री पुरावा इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत गोरोबा नरसु लोंढे यांना त्यांच्या पश्चात्त कायदेशीर वारस आहेत. त्यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत म्हणून सदर पुरावा ग्राहय धरणे योग्य होईल. सबब, असा निष्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार हेच मयताचे ''वारसाचे प्रमाणपत्र'' मिळविण्यास पात्र आहेत, करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. अर्जदार क्र. १ उषा गोरोबा लोंढे, २. विकास गोरोबा लोंढे व ३. दैवशाला गोविंद भोसले हे मयत गोरोबा नरसु लोंढे यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.
३. सदर वारस प्रमाणपत्र मयताचे नावावर असलेली कोणतीही रक्कम उचलणेकामी वापरणे येवु नये.
४. अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.03.12 17:55:49 +0530

केज. (पी.व्ही.चव्हाण)
दि. १२.०३.२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 12.03.2026 |
| Transcribed on | : 12.03.2026 |
| Checked & signed on | : 12.03.2026 |

Sd/-

(P. P. Raut),

Stenographer Grade-3,

Ct. of CJJD and JMFC, Kaij.